अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १४ ऑक्टोबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## अंधेरीत मशाल विरुद्ध कमळ... मुरजी पटेल भाजपकडून लढणार

**मुंबई** : अंधेरी पूर्वची जागा शिंदे गट लढवणार की भाजप हा तिढा आता सुटला असून मुरजी पटेल यांना भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे ही जागा आता शिंदे गटाला न जाता या ठिकाणी भाजप निवडणूक लढणार आहे.

त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या ऋतुजा लटके विरुद्ध भाजपचे मुरजी पटेल हा सामना रंगणार आहे. अंधेरी पूर्वची जागा शिवसेनेकडे असल्याने या जागेवर शिंदे गटाकडू दावा केला जात होता. त्यामुळे मुरजी पटेल नेमकं कुणाच्या चिन्हावर निवडणूक लढणार याबद्दल संदिग्धता होती. मात्र आज संध्याकाळी वर्षा या निवासस्थानी भाजप नेते आशिष शेलार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात बैठक झाली. त्यामध्ये ही जागा भाजपला सोडण्यावर दोन्ही बाजूने एकमत



झालं. त्यानंतर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी मुरजी पटेल यांना कॉल करून कमळ या चिन्हावर निवडणूक लढवण्याच्या सूचना दिल्या.अंधेरी पूर्व मतदारसंघात शिंदे गटापेक्षा भाजपची मोठी ताकत असल्याने या जागेसाठी भाजप आग्रही होता. त्यांचा उमेदवारही ठरला होता. मुरजी पटेल यांनी निवडणुकीची तयारीही सुरू केली होती.

# लटकेंना लटकावणाऱ्यांना कोर्टाने लटकावले

## राजीनामा स्वीकारण्याचा आदेश, उमेदवारीचा मार्ग मोकळा

✔ सुराज्य/सोलापूर

**अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या गटाची उमेदवारी मिळालेल्या ऋतुजा लटके यांचा राजीनामा स्वीकारल्याचे पत्र शुक्रवारी सकाळी ११ पर्यंत मुंबई महापालिकेने त्यांना द्यावे, असा आदेश देऊन मुंबई उच्च न्यायालयाने लटकेंची उमेदवारी लटकावणाऱ्यांनाच लटकावले आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेची या महिन्यात दुसऱ्यांदा उच्च न्यायालयामध्ये बेअब्रू झाली असून लटके यांचा निवडणूक लढवण्याचा मार्ग मात्र मोकळा झाला आहे.**



शिवसेनेत झालेल्या बंडानंतर शह-काटशह, क्रिया-प्रतिक्रिया, कुरघोड्या, आरोप-प्रत्यारोप असे राजकारण सुरू झाले आहे. जे शिवसेनेचे म्हणून उध्दव ठाकरेंकडे आहे; ते आपल्याकडे आलेच पाहिजे; असा अट्टाहास बंडखोर शिंदे गटाकडून केला जात आहे. त्यातून आधी आमदार पळवले, त्यानंतर खासदार पळवले, पुढे जाऊन पदाधिकारी आणि कार्यकर्तेही पळवले. याच पळवापळवीच्या वादातून शिवसेनेचे 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्हही निवडणूक आयोगाने पळवले. या पार्श्वभूमीवर अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटके यांनाच आपल्या बाजूने वळवण्याचा शिंदे गटाने प्रयत्न केला. मात्र तो फसल्यानंतर महापालिकेला हाताशी धरून लटकेंची उमेदवारीच लटकावण्याचा डाव शिंदे गटाने टाकला होता. तो डावच उच्च न्यायालयाने लटकावला.

### ▪ असा भेदभाव का?

याआधी अशाच पध्दतीने निवडणूक लढवण्यासाठी अनेकांना मुभा दिली आहे. मग ऋतुजा लटके यांच्या बाबतीत भेदभाव का केला जात आहे? अशी विचारणा न्यायालयाने पालिकेला केली. नोटीस कालावधी माफ करण्याचा पालिकेला विशेषाधिकार असताना राजीनामा का स्वीकारला जात नाही? अशी प्रकरणे न्यायालयात येता काम नयेत, अशा शब्दात न्यायालयाने पालिकेला खडसावले.

### ▪ महिन्यात दुसऱ्यांदा झाली बेअब्रू

तीच मूळ शिवसेना, बंडानंतरचे तेच दोन गट. दोन्ही गटाला दसरा मेळावा घ्यायचा होता. दोघांनाही शिवाजी पार्क मैदानच हवे होते. प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या नियमानुसार ठाकरे गटाला शिवाजी पार्क मिळत असताना महापालिकेने ते नाकारले आणि प्रकरण उच्च न्यायालयात गेले. त्यावेळी न्यायालयाने महापालिकेचे धिंडवडे काढले. त्यानंतर अंधेरी पोटनिवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा तेच घडले. तेच गट, तेच राजकारण. पुन्हा न्यायालयाने महापालिकेचे कान उपटले.

### ▪ विरोधाला विरोध

शिंदे व ठाकरे गट मूळ एकाच शिवसेनेतले. बंड केल्यानंतर दोन गट पडले. दोन्ही गट एकमेकांचेच विरोधक बनले. या गटाने त्या गटाला आणि त्या गटाने या गटाला विरोध करणे हा या दोन्ही गटांचा कार्यक्रम बनला. यातून जे या गटाला मिळाले नाही; ते त्या गटाला मिळू द्यायचे नाही. म्हणजे तो आपला विरोधक म्हणून त्याला विरोधक करणे, अर्थात विरोधाला विरोध करण्याचा प्रकार सुरू झाला आणि त्यातून सत्ताधारी गटाने प्रशासनाला हाताशी धरून अशा कुरघोड्या करणे सुरू झाले. लटकेंची उमेदवारी लटकावणे हा त्याचाच एक भाग असल्याचे बोलले जात आहे.

सविस्तर वृत्त पान ७ वर

## '१०० कोटींच्या ॲडव्हान्स रकमा अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून वसूल करा'

### पीएचई आणि परिवहन विभागाकडे सर्वाधिक रक्कम

**सोलापूर** : महापालिकेच्या विविध कामांसाठी उचलण्यात आलेल्या ॲडव्हान्स रकमांसंदर्भात वारंवार संबंधित विभाग आणि अधिकाऱ्यांना बजावून देखील अद्यापही सुमारे १०० कोटी रुपयांचा हिशोब प्राप्त नाही. आता या रकमा संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून तातडीने वसूल करण्याचे आदेश आयुक्त पी शिवशंकर यांनी दिले आहेत.

महापालिकेच्या विविध कामांसाठी उचलण्यात आलेल्या ॲडव्हान्स रकमांचा खर्च आणि कोणताही हिशोब प्राप्त झाला नाही. अद्यापही सुमारे १०० कोटींची थकबाकी आहे. आता या रकमा संबंधित अधिकारी- कर्मचाऱ्यांकडून तातडीने वसूल करण्याचे आदेश गुरुवारी महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिले. यामुळे आता विविध विभाग आणि अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये गडबड सुरू झाली आहे. विविध कामे व त्या कामांसाठी होणाऱ्या इतर बाबींसाठी महापालिका प्रशासनाच्या मान्यतेनंतर संबंधित विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी हे आगाऊ रकमा उचलतात. यानंतर संपूर्ण कामे पूर्ण झाल्यानंतर त्या खर्चाच्या तपशीलासह त्याचा हिशोब संबंधित विभागाकडे सादर केला जातो. पण महापालिकेत सन २०१५ पासून विविध विभाग प्रमुखांकडे आणि अधिकारी कर्मचाऱ्यांकडे सुमारे १२५ कोटीहून अधिक रकमा दिल्यानंतर त्याचा खर्च आणि कोणताही तपशील सादर झालेला नव्हता. प्रशासनाच्या वतीने संबंधितांना नोटीस बजावून तपशिलासह खर्च मागविण्यात आला होता. अद्यापही ॲडव्हान्स पोटी १०० कोटी रुपयांचा हिशोब मिळणे प्रलंबित आहे. आता पुन्हा एकदा महापालिका आयुक्तांनी याकडे गांभीर्याने लक्ष केंद्रित केले आहे. या संबंधित विभाग अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती मागविली. महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय आणि परिवहन उपक्रमाकडील असल्याचे निदर्शनास आले आहे.



## सचिन उर्फ बॉबी शिंदे दोन वर्षाकरिता तडीपार

**सोलापूर** : सोलापूर शहरात घातक शस्त्रानिशी गैरकायद्याची मंडळी जमून नागरिकांना दुखापत करणे, शिवीगाळ करणे, मारहाण करणे,दहशत निर्माण करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या सचिन ऊर्फ बॉबी संभाजी शिंदे (वय-३९, रा.हौसे वस्ती, आमराई) याला सोलापूर शहर जिल्हा तसेच पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका व उस्मानाबाद जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे. या तडीपार आदेशाविरुद्ध बॉबी शिंदे याने विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे अपील दाखल केले होते.

मात्र ते अपील अशांतता मान्य करून सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय परिमंडल हद्द व त्यालगतचे ग्रामीण तालुका हद्द दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, अक्कलकोट तालुका या हद्दीतून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात येत आहे, असा आदेश दिला आहे.त्यानंतर तडीपार इसम याने या तडीपारच्या आदेशाविरुद्ध उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन दाखल केले होते. मात्र रिट पिटीशनची सुनावणी घेऊन उच्च न्यायालय मुंबई यांनी तडीपार आदेश कायम ठेवून रिट पिटीशनचा अर्ज फेटाळला आहे, असे पोलीस उपायुक्त (परिमंडळ) सोलापूर शहर डॉ.वैशाली कडूकर यांच्या पत्रात नमूद आहे.



## आचारसंहितेपूर्वी जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीस मान्यता घ्या : जिल्हाधिकारी

**सोलापूर** : राज्य शासकीय कार्यालये आणि जिल्हा परिषदेने जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ चा निधी खर्च करण्यास अडचणी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्या विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या आचारसंहिता हे प्रस्ताव अडकणार नाहीत यांची दक्षता घेत विभाग प्रमुखांनी तात्काळ प्रस्ताव तयार करू तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता घ्या असे आदेश जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिले.

नियोजन भवन येथे जिल्हा वार्षिक योजनेच्या निधी खर्चाबाबत आयोजित बैठकीत शंभरकर बोलत होते. बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, समाज कल्याणचे सहायक आयुक्त कैलास आढे आदी उपस्थित होते. प्रत्येक विभागाने खर्चाचे वेळेत प्रस्ताव सादर करावेत. तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मंजुरीचे प्रस्ताव आपल्या स्तरावर प्रलंबित ठेवू नयेत. जिल्हा नियोजन समितीकडे सर्व मान्यतेसह वेळेत प्रस्ताव सादर करावेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमुळे जिल्ह्यात लागणारी आचारसंहिता, विधानपरिषद निवडणूक यामुळे प्रस्तावांना मंजुरी मिळण्यास अडथळे येऊ नयेत, यामुळे प्रस्तावांना मंजुरी घेऊन ठेवावी. यामुळे संबंधित यंत्रणांनी गाफील न राहता प्रस्तावांना तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता मिळवून घ्याव्यात. मार्च अखेर निधी खर्च झाला पाहिजे अशा सूचना देखील केल्या.



## ठाकरे गट, राष्ट्रवादीला खंजीर चिन्ह द्या; पडळकरांची टीका

**बारामती** : शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादी एकत्र करून त्यांना खंजीर चिन्ह द्यायला हवे होते, मशाल रुजवायला वेळ लागेल, पण खंजीर म्हटलं तर लोकांच्या लगेच लक्षात येईल. कारण राष्ट्रवादीचा हा जन्मच खंजिरातून झालेला आहे. आता नवा एक खंजीर घुसवणारा निर्माण पवारांनी केलेला आहे. मी आयोगाला पत्र लिहीन की राष्ट्रवादी चे चिन्ह गोठवून सेना आणि राष्ट्रवादीला खंजीर चिन्ह द्या. फक्त ते एकमेकांत घुसवू नका, अशी टीका आमदार गोपीचंद पडळकर यांनी बारामतीत केली.

## लम्पीसाठी साखर कारखान्यांनी समन्वय अधिकारी नेमावा

### मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या सूचना

**सोलापूर** : जिल्ह्यात लम्पी आजारग्रस्त जनावरे वाढत आहेत. जिल्ह्यात खासगी आणि सहकारी साखर कारखाने मोठ्या प्रमाणात आहेत. सध्या ऊसतोडणी कामगार बैलगाड्यांसोबत, गायी, म्हशींसह येत आहेत. यामुळे येणाऱ्या जनावरांचे लसीकरण झाले की नाही, याची तपासणी कारखाना प्रशासनाने करावी. तसेच यासाठी सर्व साखर कारखान्यांनी एक समन्वय अधिकारी नेमावा, अशा सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिल्या.



जिल्ह्यातील लम्पी आजाराबाबत नियोजन भवन येथे गुरूवारी सीईओ स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी त्यांनी सूचना दिल्या. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नानासाहेब सोनवणे, प्रादेशिक उपसंचालक (साखर) पांडुरंग साठे, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. ज्योती परदेशी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. धनाजी गिड्डे उपस्थित होते. तसेच ऑनलाईनद्वारे सर्व साखर कारखान्यांचे व्यवस्थापकिय संचालक उपस्थित होते. यावेळी सीईओ स्वामी म्हणाले, जिल्ह्यात लम्पी आजाराने ५५ जनावरांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत जिल्ह्यात ९३.२९ टक्के जनावरांचे लसीकरण झाले आहे. उर्वरित जनावरांचे आठवड्याभरात लसीकरण होईल. प्रत्येक साखर कारखान्यांनी ऊसतोडणीसाठी जिल्ह्यात येणाऱ्या जनावरांचे लसीकरण झाले की नाही, याची तपासणी करण्यासाठी समन्वय अधिकारी नेमावा. शिवाय कारखान्यांनी निवडक कर्मचारी, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेऊन त्यांना तपासणीसाठी नियुक्त करावे.

### कारखान्याने जिल्हा प्रशासनाशी समन्वय ठेवावा

जिल्ह्यात येणारी बैल, गायी यांचे लसीकरण झाल्याचे तपासून खात्री करूनच प्रवेश द्यावा. तपासणीमध्ये त्या जनावरांना लस देऊन २१ दिवस झालेले असावे. २१ दिवस झाले नसल्यास अशा जनावरांना त्वरित कारखाना परिसरातील विलगीकरण कक्षात ठेवावे. यासाठी विलगीकरण कक्ष तयार करावा. यासाठी साखर कारखाना प्रशासनाने जिल्हा प्रशासनाशी समन्वय ठेवावा. संपर्कात राहून आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही यावेळी सीईओ स्वामी यांनी दिल्या.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता तरी पुरे !!

| कल्याण |
| --- |
| ------- |

| मेन बाजार |
| --- |
| ------- |

## सोलापूरसह नऊ ठिकाणी प्रादेशिक परिवहन कार्यालय

✔ सुराज्य/पुणे

**कार्यक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने परिवहन विभागाची पुनर्रचना करण्यात येत असून, त्यात 'आरटीओ'च्या पदांची संख्या वाढण्यापासून कार्यालयातील कर्मचारी संख्येत समानता, पाच परिवहन सहआयुक्त पदांची नव्याने निर्मिती आणि ऑनलाइन प्रणालीसाठी जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणूक आदी गोष्टींचा समावेश आहे. नवीन बदलानुसार राज्यातील पिंपरी-चिंचवड, सातारा, सोलापूर, नगर, जळगाव, पालघर चंद्रपूर, अकोला आणि बोरिवली या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांचे प्रादेशिक कार्यालयात रूपांतर होणार आहे.**




आरटीओ अधिकाऱ्यांच्या नियमित बदल्या प्रस्तावित आहेत. पदोन्नतीदेखील काही वर्षांपासून प्रलंबित आहेत. या दोन्ही गोष्टी लवकरच मार्गी लागणार आहेत. मात्र, राज्याच्या परिवहन विभागाने नव्याने सादर केलेल्या आकृतिबंधाला नुकतीच मान्यता देण्यात आली असून, त्यानुसारच येत्या काळात नेमणुका होणार आहेत.

नवीन आकृतिबंधानुसार कामकाजातही बदल होणार असून, त्याचा थेट लाभ सामान्य नागरिकांना होणे अपेक्षित आहे.

### ▪ १८ वर्षांनी आकृतिबंधाला मुहूर्त

सातत्याने अद्ययावत होणारे तंत्रज्ञान आणि कालसुसंगत बदल अंगीकारून प्रशासकीय यंत्रणेतही बदल व्हावा, या उद्देशाने राज्य सरकारच्या नियमानुसार परिवहन विभागाचा दर दहा वर्षांनी नव्याने आकृतिबंध करणे अनिवार्य आहे. मात्र, परिवहन विभागाचा शेवटचा आकृतिबंध २००४मध्ये मंजूर करण्यात आला होता. त्या वेळी 'आरटीओ'चे कामकाज 'मॅन्युअली' चालत होते. मात्र, त्यानंतर संगणकीकरण झाले. 'आरटीओ'चे कामकाज ऑनलाइन केले जाऊ लागले. गेल्या काही वर्षांत 'आरटीओ'ची प्रणाली दोन वेळा अद्ययावत करण्यात आली. मात्र, त्यानुसार प्रशासकीय यंत्रणेत बदल झाला नव्हता. आता थेट १८ वर्षांनी आकृतिबंध अंमलात येणार आहे.

### ▪ त्रुटी लवकर सुटणार?

परिवहन विभागाचे कामकाज सध्या परिवहन पोर्टलद्वारे ऑनलाइन चालते. त्यात 'वाहन' आणि 'सारथी' हे दोन विभाग आहेत. या प्रणालीच्या वापरापासून त्यात सातत्याने काही ना काही तांत्रिक अडचणी उद्भवत आहेत. त्या अडचणी सोडविताना आरटीओ अधिकाऱ्यांना राष्ट्रीय माहिती केंद्रातील (एनआयसी) अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवावा लागतो. मात्र, ही प्रक्रिया वेळखाऊ असते. यासाठी सध्या डेडिकेटेड अधिकारी नाही. नवीन रचनेत 'वाहन' आणि 'सारथी'साठी सहायक परिवहन अधिकारी (एआरटीओ) नेमला जाणार आहे. त्यासाठी एआरटीओ पदांची संख्या १००वरून १७४ करण्यात आली आहे.

परिवहन विभागाने नव्याने केलेल्या आकृतिबंधाला मान्यता मिळाली असून, येत्या काळात होणाऱ्या बदल्या आणि पदोन्नती त्यानुसारच होणार आहेत. **- विवेक भीमनवार, परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य**